# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्यकाळातील १५ वा रविवार - १४ जुलै २०१९

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरू** ः ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या, तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा आपण विश्वास बाळगू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. परमेश्वराच्या कळपाच्या आध्यात्मिक व सामाजिक प्रगतीसाठी झटणारे आपले पोप फान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, सर्व धर्मगुरू व व्रतस्थ यांचे जीवन कृपेने भरलेले असावे व सर्वांकडून त्यांना सहकार्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय, सामाजिक व शासकीय अधिकाऱ्यांनी त्यांची नियुक्ती सामाजिक हितासाठी आहे याची जाणीव ठेवावी व आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. ख्रिस्ती म्हणून जगत असताना आपल्या पाचारणाची आपल्याला आठवण असावी, आपल्या शब्दाद्वारे व कृतीद्वारे आपण सुवार्तेचा प्रचार करावा, तसेच जे लोक सुवार्ता प्रचारासाठी हातभार लावत आहेत त्यांना चांगले आरोग्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. अतिवृष्टीपासून निर्माण होणाऱ्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी आपण तयार असावे, पूर परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून उपाययोजना केली जावी, शेतीसाठी व पिण्यासाठी आवश्यक असणारा मुबलक पाऊस आपल्यास मिळावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. जे लोक आजारी आहेत ते लवकर बरे व्हावेत, परगावी व परदेशी असणारे आपले बांधव सुरक्षित असावेत, तसेच नैसर्गिक व इतर आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरू** ः हे पित्या, तुझ्या लोकांच्या या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्याचा स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.